सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
मध्यवर्ती इमारत, बी.जे.रोड, पुणे-४११ ००१

करार पध्दतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या सेवा उपलब्धतेसाठी जाहिरात

१. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या अधिकारी यांची संख्या – १
२. वयोमर्यादा – नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.
३. कंत्राटी पध्दतीन नियुक्त करावयाच्या अधिकारी यांनी शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/ १३ दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदीची पुर्तता करणे आवश्यक असून सदर तरतूदी त्यांचेवर बंधनकारक असतील.
४. मानधन- करार पध्दतीने मानधन तत्वावरील अधिकारी यांना शासनाचे निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र. १००/ १३ दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार मानधन देण्यात येईल.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत करार पध्दतीने मानधन तत्वावर सहकार विभागातील प्रशासन विभागामधील सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या सेवा उपलब्ध करण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. विहीत नमुन्यातील अर्ज https://sahakarayukta.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. इच्छुकांनी ते परिपूर्णरित्या भरुन दि. ०३/०७/२०१८ पर्यंत उपनिबंधक सहकारी संस्था (आस्थापना) यांचेकडे उपरोक्त नमूद पत्त्यावर पाठवावेत. कामकाजाचे स्वरुप व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील अन्य बाबी उपरोक्त नमूद वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

जा.क्र.आस्था/कंत्राटीनियुक्ती/सहा.निबं/पुणे/१८
दिनांक :-२२/०६/२०१८

(डॉ.विजय झाडे)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# (कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी अर्जाचा नमुना)

## करार पध्दतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक यांच्या सेवा उपलब्धतेसाठी अर्ज.

१. अर्जदाराचे संपुर्ण नाव व पत्ता :-

२. दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक :-

३. ई-मेल :-

४. जन्मतारीख :-

५. दिनांक- ३१/०५/२०१८ रोजी वय :-

६. शासन सेवेतुन सेवानिृत्त झाल्याचा दिनांक :-

७. वयाची ६५ वर्षे पुर्ण होत असल्याचा दिनांक :-

८. शैक्षणिक पात्रता :-

९. ज्या पदावरुन सेवानिवृत्त झाले त्याचे पदनाम व कार्यालयाचे नाव :-

१०. कामकाजाचा अनुभव :-

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी :-
अर्जदाराचे संपुर्ण नाव :-

सादर

दि.२२.०६.२०१८

विषय :- छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या अंमलबंजावसाठी सेवा निवृत्त सहाय्यक निबंधक सहकारी संस्था या दर्जाच्या अधिका-याची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील शेतक-यांच्या थकीत कर्जाची कर्जमाफी करून अशा शेतक-यांना पुन्हा नव्याने कर्ज वाटप होण्याच्या दुष्टीने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ लागू करण्यात आली असून सदर योजनेची अंमलबजावणी जून,२०१७ पासून राज्यात करण्यात येत आहे.

सदरची योजना ही संपुर्ण पणे ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत असून सदर योजनेची अंमलबजावणी करताना खालील प्रमाणे प्रकीया राबविण्यात येत आहे.

१) सदर योजनेच्या लाभा साठी शेतक-यांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरून घेणे.
२) जिल्हा मध्यवर्ती बँकां, राष्ट्रीकृत्त बँकां, खाजगी बँकां, ग्रामीण बँकां यांनी संबंधित बँकेतील थकबाकीदार शेतक-यांची माहिती विहित नमुण्यात ऑनलाईन पध्दतीने भरणे.
३) शेतक-यांनी भरलेले अर्ज व बँकांकडील संबंधित शेतक-यांची माहिती यांची एकत्रित प्रकीया करून पात्र शेतक-यांची ग्रीनलिस्ट ऑनलाईन पध्दतीने प्रशिध्द करणे.
४) ग्रीनलिस्ट मध्ये पात्र शेतक-यांना सदर योजनेचा लाभ बँकांकडून देणे.
५) ज्या शेतक-यांची त्यांच्या आर्जातील माहिती अगर बँकेने संबंधित शेतक-यांची ऑनलाईन पध्दतीने भरलेली माहिती या मध्ये तफावत असेल अशी माहिती दुरुस्त करून पुन्हच्छ ऑनलाईन रिअपोलोड करणे.
६) ज्या शेतक-यांची त्याच्या आर्जतील माहिती व बँकेतील माहिती जुळत नाही अशी खाती तालुका स्तरीय समितीकडे पाठवुन सदर खात्याबाबत पडताळणी करून पात्र / अपात्रता निश्चित करून पोट्रल वर अपलोड करणे.
७) कर्जमाफी झालेल्या शेतक-यांना खरीप,२०१८ मध्ये कर्जवाटप करणे.

वरील प्रमाणे सदर योजनेचे कामकाज हे युध्द पातळीवर व मोहीम म्हणून करण्यात येत असून सदर कामकाजात सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था कार्यालयाची खालील प्रमाणे महत्वाची भुमीका आहे.

१) ग्रीनलिस्ट प्रमाणे पात्र शेतक-यांना लाभ देणे साठी रक्कमेचे वितरण संबंधित बँकांना करणे.
२) सदर बँकांनी संबंधित शेतक-यांना लाभ दिले बाबतची कार्यवाही अहवाल दररोज घेणे तसेच शासनास सादर करणे.
३) सदर योजनेच्या अंमलबजावणी बाबत घेण्यात येना-या आढवा सभेसाठी आवश्यक त्या माहित्या क्षेत्रिय कार्यालये, संबंधित बँकां, यांच्याकडून प्राप्त करून घेणे, सदर माहित्याचे विषलेशन करणे सदरच्या माहित्या शासनास सादर करणे.
४) तालुका स्तरीय समितीने केलेल्या कामकाजाबाबतचा आढावा घेणे.
५) शासन,महाऑनलाईन संबंधित बँकां, क्षेत्रिय कार्यालये यांच्या मध्ये समनवय साधने व आवश्यक माहितीचे तातडीने अदान प्रधान करणे.
६) कर्जमाफीचा लाभ दिलेल्या शेतक-यांच्या कर्जखात्याचे लेजर आपडेशन करणेबाबत पाठपुरावा करणे व माहिती घेणे.
७) बँक स्तरावर व तालुका स्तरीय समिती स्तरावर प्रलंबित असलेल्या कर्जखात्याबाबत माहिती घेणे, सदर प्रलंबित खात्याचा निपटारा होईल या बाबत पाठपुरावा करणे.
८) सदर लाभार्थी शेतक-या खरीप २०१८ मध्ये कर्जवाटप करणेबाबत संबंधित बँकांकडे पाठपुरावा करणे व माहिती संकलित करणे.
९) या व्यतिरीक्त सदर योजनेशी संबंधित विविध प्रकारची कामे सहकार आयुक्त कार्यालया स्तरावरुन करण्यात येत आहेत.

वरील सर्व प्रकारची कामे करण्यासाठी स्वतत्र रीत्या अधिकारी व कर्मचारी यांची आवश्यकता असून सद्या स्थितत कृषीपत कार्यासनाकडून काम केलेजात असून सदर कार्यासनाकडे वर्ग-१ चा अधिकारी १ व कर्मचारी ९

कर्मचारी कार्यरत आहेत त्यामुळे उक्त नमुद कामकाज करने करीता सेवा निवृत्त सहाय्यक निबंधक दर्जाच्या अधिका-यांची नियुक्ती कंत्राटी पध्दतीने केलेस व कर्जमाफी कक्षासाठी स्वत्ररीत्या ४ कर्मचारी सदर कक्षास कामकाजासाठी दिलेस सदर कामकाजा मध्ये सुलभता व सुसुत्रता येणे अश्य होईल .

कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या अधिक-याने खालील प्रमाणे कामकाज करवयाचे आहे.

१) ग्रीनलिस्ट प्रमाणे पात्र शेतक-यांना लाभ देणे साठी रक्कमेचे वितरण संबंधित बँकांना करणे.

२) सदर बँकांनी संबंधित शेतक-यांना लाभ दिले बाबतची कार्यवाही अहवाल दररोज घेणे तसेच शासनास सादर करणे.

३) सदर योजनेच्या अंमलबजावणी बाबत घेण्यात येना-या आढवा सभेसाठी आवश्यक त्या माहित्या क्षेत्रिय कार्यालये, संबंधित बँकां, यांच्याकडून प्राप्त करून घेणे, सदर माहित्याचे विषलेशन करणे सदरच्या माहित्या शासनास सादर करणे.

४) तालुका स्तरीय समितीने केलेल्या कामकाजाबाबतचा आढावा घेणे.

५) शासन,महाऑनलाईन संबंधित बँकां, क्षेत्रिय कार्यालये यांच्या मध्ये समनवय साधने व आवश्यक माहितीचे तातडीने अदान प्रधान करणे.

६) कर्जमाफीचा लाभ दिलेल्या शेतक-यांच्या कर्जखात्याचे लेजर आपडेशन करणेबाबत पाठपुरावा करणे व माहिती घेणे.

७) बँक स्तरावर व तालुका स्तरीय समिती स्तरावर प्रलंबित असलेल्या कर्जखात्याबाबत माहिती घेणे, सदर प्रलंबित खात्याचा निपटारा होईल या बाबत पाठपुरावा करणे.

८) सदर लाभार्थी शेतक-या खरीप २०१८ मध्ये कर्जवाटप करणेबाबत संबंधित बँकांकडे पाठपुरावा करणे व माहिती संकलित करणे.

९) या व्यतिरीक्त सदर योजनेशी संबंधित विविध प्रकारची कामे सहकार आयुक्त कार्यालया स्तरावरुन करण्यात येत आहेत.

१०) सदर योजनेशी संबंधित विधानसभा प्रश्न उत्तर देणे,शेतक-यांचे तक्रार यांना उत्तर देणे, शासनास आवश्यक ती माहिती सादर करणे, कर्जमाफी योजनेशी संबंधित न्यायालनियबाबी बाबतची माहिती तयार करणे.

वरील सर्व बाबी करीता श्री.नंदकिशोर झिने सेवा निवृत्त सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांची सेवा कंत्राटी पध्दतीने घेण्याबाबत शासनाने दिनांक १.०६.२०१८ च्या पत्रान्वये शासन निर्णय दि.८.०१.२०१६ मधील तरतुदी विचारत घेऊन या कार्यालयाच्या स्तरावरून कार्यवाही करणेबाबत कळविले नुसार श्री.नंदकिशोर झिने सहाय्यक निबंधक यांची सेवा सदर योजनेची अंमलबजावणी होई पर्यंत अगर ६ महिने कालावधी या पैकी जी कमी असेल त्या कालावधी साठी कंत्राठी पध्दतीने नियुक्त करणेसाठी ची पुढील करणे करीता आस्थापना शाखेस कळविण्यात यावे असे वाटते.